# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


८२) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १२.१२.२०२५

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (०५/१२/२०२५ ते ११/१२/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१३/१२/२०२५ ते १७/१२/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | दिनांक | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ३१ | ३१ | ३२ | ३२ | ३२ |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | १० | ११ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६८ | ६८ | ७२ | ७१ | ७२ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३२ | ३३ | ३४ | ३४ | ३४ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ५ | ७ | ७ | ६ | ७ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | **हवामान विभागाच्या अंदाजानुसार दि. १२ डिसेंबर रोजी काही ठिकाणी थंडीच्या लाटेची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी स्वतःची व जनावरांची काळजी घ्यावी.** |
| *रबी* पिके | वाढीची अवस्था | **१) तापमान नियंत्रित ठेवण्याकरिता पिकांना रात्रीच्या वेळेस पाणी द्यावे.**<br>**२) उस तोड कामगार यांनी विशेष काळजी घ्यावी. थंडीच्या इशाऱ्या दरम्यान पहाटेच्या वेळी काम करणे शक्यतो टाळावे.** |
| गहु | मुकुट मुळे फुटण्याची अवस्था | गहु पिकात चांदवेल, हरळी यासारख्या तणांचा प्रादुर्भाव होतो. त्याकरीता जरूरीप्रमाणे एक किंवा दोन वेळा खुरपणी, तसेच कोळपणी करून जमीन मोकळी करावी. आंतरमशागतीमुळे तणांचा नाश होतो व जमिनीत ओलावा टिकून राहण्यास मदत होते. गहू पिकातील अरूंद पानांचे आणि रूंद पानांच्या तण नियंत्रणासाठी पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी दर हेक्टरी मेटसल्फ्यूरॉन मिथाईल २% WP हेक्टरी २० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात किंवा कलोडीनॉफोप प्रोपारजील १५% + मेटसल्फ्यूरॉन मिथाइल १% थझ हेक्टरी ४०० ग्रॅम ३७५ लिटर पाण्यातून मिसळून गव्हाच्या २ ओळीत फवारावे. तणनाशक फवारल्यानंतर १० ते १२ दिवस पाणी देऊ नये. |
| ऊस | वाढीची अवस्था | पांढऱ्या माशीच्या पर्यावरणपूरक व्यवस्थापनासाठी लेकॅनिसिलियम लेकॅनी @ ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून संध्याकाळच्या वेळी फवारणी करावी. |
| तूर | शेंगा भरण्याची अवस्था | तूर पिकामध्ये स्टेरिलिटी मोझेक रोग हा माइट्सद्वारे पसरतो, माइट्सद्वारे प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी प्रोपार्गाइट ५७ ईसी @ १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| करडई | वाढीची अवस्था | मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० ई सी @ १५ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| ज्वारी | वाढीची अवस्था | तापमानात घट झाल्यास पिकामध्ये मावा किडीचे प्रमाण वाढते त्यामुळे चिकटा रोगाचा प्रादुर्भाव होतो. चिकटा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० ई सी @ १५ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>या किडीच्या नियंत्रणासाठी पिवळया रंगाचे चिकट सापळे एकरी ४ या प्रमाणात लावावे तसेच प्रादुर्भाव दिसताच ५% निंबोळी अर्काची फवारणी ५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात करावी. |
| हरभरा मोहरी, राजमा | वाढीची/ रोप अवस्था | जास्त काळ दंव बिदु पिकाच्या पानावर राहिल्यास संवेदनशील पिकांमध्ये बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते.<br>त्याकरीता ५०० पीपीएम थायोयुरियाची (१००० लिटर पाण्यात ५०० ग्रॅम थायोयुरिया) फवारणी करावी. |
| डाळिंब | | फुलकीड्यांच्या नियंत्रणासाठी स्पिनोसॅड ४५ एससी @ ३ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,

## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९

ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **जरबेरा** | | पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी एसीटामिप्रिड २० एसपी @ ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारणी करावी. |
| **पशुसंवर्धन** | | गुरांना रात्रीच्या वेळेस गोठ्यात बांधावे आणि थंडीपासून बचाव करण्यासाठी गोठा स्वच्छ व कोरडा ठेवावा.<br>थंडी पासुन संरक्षण करण्यासाठी निरोगी ठेवण्यासाठी जनावरांच्या आहारात प्रथिने आणि खनिजे यांची मात्रा वाढवा.<br>थंडीमध्ये जनावरांची उर्जेची गरज भागविण्यासाठी नियमितपणे जनावरांना खनिज मिश्रण, मीठ व गव्हाचा भरडा, गूळ इत्यादीचे मिश्रण योग्य प्रमाणे द्यावे. |
| **कुक्कुटपालन** | | पक्ष्याच्या शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन उष्णता निर्माण करावी.<br>सकाळच्या वेळी जनावरे चरण्यास सोडु नये.<br>रात्रीच्या वेळी जनावरे उघड्यावर बाधु नये. |

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : २२.१२.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**